Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १९६ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION



नांद येथे महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव संपन्न (पान २ वर)

कुणाच्या गळ्यात पडणार विजयाची माळ? ४७ पदवीधर आणि ३० शिक्षक उमेदवारांच्या भवितव्याचा आज फैसला

पदवीधर-शिक्षक मतदारसंघाचा आज फैसला!

पुणे विभाग विधान परिषद निवडणुकीच्या मतमोजणीकडे राजकीय पक्षांचे लक्ष

जन सम्राट टाईम्स

पुणे | महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीचा निकाल आज, मंगळवारी जाहीर होणार असल्याने राजकीय वर्तुळाचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे. बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलमध्ये मतमोजणी होणार आहे. दोन्ही मतदारसंघांतील उमेदवारांचे राजकीय भवितव्य या निकालातून स्पष्ट होणार असून, मतदानाची टक्केवारी आणि पसंतीक्रमानुसार होणारी मतमोजणी यामुळे निकालाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या निवडणुकीत पदवीधर मतदारसंघात एकूण ३ लाख ८८ हजार १९ मतदारांपैकी २ लाख ४३ हजार ६११ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे मतदानाची टक्केवारी ६२.७८ इतकी नोंदविण्यात आली. शिक्षक मतदारसंघात ६१ हजार ९४० मतदारांपैकी ५३ हजार १८५ मतदारांनी मतदान केले. येथे ८५.८७ टक्के मतदान झाले. दोन्ही मतदारसंघांतील मतदानाच्या या आकडेवारीनंतर आता मतमोजणीच्या प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत मतपत्रिकांवरील पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी केल्यानंतर आवश्यक विजयाचा कोटा पूर्ण करणाऱ्या उमेदवाराला विजयी घोषित केले जाईल. कोणत्याही उमेदवाराला पहिल्या



फेरीत आवश्यक कोटा मिळाला नाही, तर नियमानुसार सर्वांत कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून त्याच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीची मते पात्र उमेदवारांकडे हस्तांतरित केली जातील. वैध मतांची अंतिम संख्या, विजयाचा कोटा आणि पुढील पसंतीच्या मतांचे हस्तांतरण या बाबी निकाल ठरविण्यात महत्त्वाच्या ठरणार आहेत. पदवीधर मतदारसंघात भाजपच्या डॉ. स्मिता जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हर्षदा देशमुख-जाधव आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सुनील मोदी यांच्यासह एकूण ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. २०२०च्या निवडणुकीत या मतदारसंघात २ लाख २८ हजार २५९ मते वैध ठरली होती. त्या वेळी विजयाचा कोटा १ लाख १४ हजार १३० होता. यंदा अंदाजे २ लाख २५ हजार ते २ लाख ३० हजार वैध मते गृहीत धरल्यास विजयाचा कोटा सुमारे १ लाख १२ हजार ते १ लाख १५ हजारांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. मात्र, अंतिम कोटा वैध मतांची प्रत्यक्ष संख्या निश्चित झाल्यानंतरच स्पष्ट होईल. शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे, काँग्रेसचे विद्यमान आमदार प्रा. जयंत आसगावकर, शिवसेना (शिंदे गट) समर्थित उमेदवार सचिन सानप आणि माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह एकूण ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.२०२०च्या निवडणुकीत या मतदारसंघात ५० हजार २२७ मते वैध ठरली होती. त्यावेळी विजयाचा कोटा २५ हजार ११४ होता. यंदा वैध मतांची संख्या मागील निवडणुकीच्या तुलनेत जवळपास त्याच पातळीवर राहिल्यास सुमारे २५ हजार २०८ मतांचा कोटा अपेक्षित धरला जात आहे. मात्र, हा केवळ अंदाज असून प्रत्यक्ष वैध मतांच्या आधारेच अंतिम कोटा निश्चित होणार आहे.दोन्ही मतदारसंघांतील निकाल महायुती आणि महाविकास आघाडीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहेत. पदवीधर मतदारसंघातील ४७ आणि शिक्षक मतदारसंघातील ३० उमेदवारांमुळे मतांची विभागणी कशी होते, याकडे लक्ष असेल. पहिल्या पसंतीच्या मतांनंतरही विजयाचा कोटा पूर्ण न झाल्यास पुढील पसंतीच्या मतांची मोजणी निर्णायक ठरू शकते.

मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

मतमोजणी प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि अचूक व्हावी यासाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. दोन्ही मतदारसंघांसाठी मिळून १४२ मतमोजणी टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यापैकी पदवीधर मतदारसंघासाठी १००, तर शिक्षक मतदारसंघासाठी ४२ टेबल ठेवण्यात आले आहेत. पसंतीक्रमानुसार मतांची मोजणी होत असल्याने प्रत्येक मतपत्रिकेची तपासणी आणि मतांचे हस्तांतरण ही प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.

Selected

लाडकी बहीण योजनेनंतर आता विद्यार्थिनी योजना!

मुंबई । मुलींच्या शिक्षणाला आर्थिक हातभार लागावा आणि पैशांअभावी त्यांचं शिक्षण अडू नये, यासाठी उल्हासनगर महापालिकेकडून एक नवी योजना सुरू करण्यात आली आहे.'लाडकी बहीण' योजनेच्या धर्तीवर आता विद्यार्थिनींसाठी 'ज्योति कालानी लाडकी विद्यार्थिनी योजना' राबवण्यात येणार आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत सातवी ते बारावीमध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थिनींना वर्षाला सहा हजार रुपयांचं आर्थिक सहाय्य दिलं जाणार आहे. म्हणजेच महिन्याला 500 रुपयांच्या समतुल्य मदत मिळणार आहे. शालेय साहित्य, वह्या-पुस्तकं आणि शिक्षणाशी संबंधित छोट्या-मोठ्या खर्चासाठी या रकमेचा उपयोग होऊ शकतो. या योजनेसाठी आतापर्यंत 19 हजार विद्यार्थिनींची नोंद झाल्याची माहिती समोर आली आहे.

फायनान्स कंपन्यांना उपमुख्यमंत्री शिंदेंचा दणका; 'कर्जासाठी तगादा लावाल, तर खडी फोडायला जाल'

जन सम्राट टाईम्स

संभाजीनगर । प्रतिनिधी: शेतकऱ्यांवर जबरदस्ती करून त्यांचा छळ करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या, खासगी सावकार आणि बँकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्यास संबंधितांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांची रवानगी तुरुंगात केली जाईल. तुरुंगात त्यांना दगड फोडायला लावू, असा कडक इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल दुर्गम हरसूल येथे शिवसेनेच्या वतीने आयोजित दिवाळी शिधावाटप कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी उपमहापौर विलास शिंदे यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेल्या १० हजार विशेष दिवाळी शिधा किटचे आदिवासी आणि शेतकरी कुटुंबांना वाटप करण्यात आले. नांदेडमधील शेतकऱ्याच्या मृत्यूचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, की एका शेतकऱ्याला फायनान्स कंपनीच्या कार्यालयात नेऊन मारहाण करण्यात आली. त्यात त्याचा मृत्यू झाला.याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. बँका, विमा कंपन्या, खासगी सावकार आणि मायक्रो फायनान्स संस्थांनी शेतकऱ्यांवर दबाव आणून त्यांचा छळ करू नये. जबरदस्तीच्या कर्जवसुलीवर सरकारने बंदी घातली आहे. तरीही शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दबाव टाकणे किंवा त्यांच्याशी गैरवर्तन करण्याचे प्रकार घडल्यास शेतकरी आणि शिवसैनिकांनी संबंधितांना थेट पोलिसांच्या ताब्यात द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री असताना सुरू केलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, अशी ग्वाही



आणि राज्य सरकारचे सहा हजार रुपये, असे मिळून शेतकऱ्यांना वर्षाला १२ हजार रुपयांची सन्माननिधीही नियमित मिळत राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील ३०५ तालुक्यांना भीषण दुष्काळाचा फटका बसला आहे. शेतातील उभी पिके वाळली आहेत, मंत्रिमंडळाने प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर दुष्काळ जाहीर केला आहे. दुष्काळग्रस्त शेतक-यांना सरकारकडून मिळणाऱ्या सर्व १२ सवलती दिल्या जातील. तसेच तातडीची मदत म्हणून पाच हजार रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.दुष्काळग्रस्त भागांत तातडीने 'किसान भुसे आणि स्थानिक लोकप्रतिनिधींना देण्यात आले आहेत.

या केंद्रांमार्फत पीक नुकसानीचे सर्वेक्षण, सरकारी मदतीचे वितरण, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था यावर लक्ष ठेवण्यात येणार आहे. दुष्काळामुळे गरीब कुटुंबांना मुलींचे विवाह करणे कठीण होत असल्याने अशा कुटुंबांची यादी तयार करण्याचे निर्देशही शिंदे यांनी दिले.शेतकऱ्यांवर जबरदस्ती करून त्यांचा छळ करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्या, खासगी सावकार आणि बँकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. शेतकऱ्यांना त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्यास संबंधितांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांची रवानगी तुरुंगात केली जाईल. तुरुंगात त्यांना दगड फोडायला लावू, असा कडक इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. नाशिक जिल्ह्यातील आदिवासीबहुल दुर्गम हरसूल येथे शिवसेनेच्या वतीने आयोजित दिवाळी शिधावाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

या वेळी उपमहापौर विलास शिंदे यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेल्या १० हजार विशेष दिवाळी शिधा किटचे आदिवासी आणि शेतकरी कुटुंबांना वाटप करण्यात आले. नांदेडमधील शेतकऱ्याच्या मृत्यूचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, की एका शेतकऱ्याला फायनान्स कंपनीच्या कार्यालयात नेऊन मारहाण करण्यात आली. त्यात त्याचा मृत्यू झाला.याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. बँका, विमा कंपन्या, खासगी सावकार आणि मायक्रो फायनान्स संस्थांनी शेतकऱ्यांवर दबाव आणून त्यांचा छळ करू नये. जबरदस्तीच्या कर्जवसुलीवर सरकारने बंदी घातली आहे. तरीही शेतकऱ्यांच्या घरी जाऊन दबाव टाकणे किंवा त्यांच्याशी गैरवर्तन करण्याचे प्रकार घडल्यास शेतकरी आणि शिवसैनिकांनी संबंधितांना थेट पोलिसांच्या ताब्यात द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

देवाक काळजी रे! 'या' जिल्ह्यांमध्ये भीषण पाणीटंचाई

जन सम्राट टाईम्स

पुणे- । प्रतिनिधी: पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने पुणे आणि (Maharashtra Drought) अहिल्यानगर जिल्ह्यांतील पाणीटंचाईचे संकट अधिक गडद झाले आहे. ओढे, नाले, बंधारे आणि कॅनॉल कोरडे पडू लागल्याने शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून, पाण्याअभावी रब्बी हंगामातील पिके सुकू लागली आहेत. शेतीचे नुकसान टाळण्यासह ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी कुकडी, हुतात्मा बाबू गेनू (डिंभे) आणि चासकमान प्रकल्पांतून तातडीने पाण्याचे (Pune) आवर्तन सोडावे, अशी मागणी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र देऊन तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे. यंदाच्या पावसाळ्यात जुलैनंतर पावसाने ओढ दिल्याने शेतीचे नियोजन कोलमडले आहे. खरीप हंगामातील भात, सोयाबीन यांसारख्या पिकांना पावसाच्या खंडाचा फटका बसला असून, आता रब्बी हंगामातील पिकांसमोरही पाण्याचे संकट उभे राहिले आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेली पिके जमिनीतील ओलावा संपल्याने सुकू लागली आहेत. अनेक ठिकाणी



ओढे, नाले आणि लहान बंधारे कोरडे पडत असल्याने शेतीसाठी पाणी उपलब्ध होणे कठीण झाले आहे.पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागासह अहिल्यानगर जिल्ह्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसावर आणि धरणांच्या आवर्तनांवर अवलंबून आहे. पावसाने साथ सोडल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. वेळेत पाणी न मिळाल्यास उभ्या पिकांचे नुकसान वाढण्याची भीती आहे. त्यातच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरजही आगामी काळात गंभीर होण्याची शक्यता असल्याने धरणांतील उपलब्ध पाण्याचे नियोजन करून आवर्तन सोडण्याची मागणी जोर धरत आहे. पावसातील दीर्घ खंडामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न एकाच वेळी निर्माण होत असताना उपलब्ध जलसाठ्यांचा वापर कसा करायचा, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. आवर्तनाला विलंब झाल्यास रब्बी पिकांच्या नुकसानीची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याची गरज, उपलब्ध साठा आणि विविध भागांतील मागणी यांचा समतोल साधून तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर दिलीप वळसे पाटील यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना पत्र देऊन दोन्ही जिल्ह्यांतील पाणीटंचाईच्या परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

आ.राठोड यांना भावपूर्ण आदरांजली

मुखेड,: लोकनेते कै. आमदार गोविंदराव राठोड यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. यावेळी मुखेडचे आमदार डॉ. तुषार राठोड यांची उपस्थित मान्यवरांनी सदिच्छा भेट घेतली. कै. गोविंदराव राठोड यांच्या स्मृतींना उजाळा देत उपस्थितांनी त्यांना आदरांजली अर्पण केली.मान्यवरांची उपस्थिती या वेळी शंकरराव मुंडे, संघशिल भद्रे सर, कांताराम पाटील आगलावे, काशिनाथ पाटील आगलावे, व्यंकटराव पाटील कळकेकर, गवते पाटील होकर्णेकर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

ड्रग्ज तस्कराला पकडण्यासाठी धावले, पण काळाचा घाला!

जन सम्राट टाईम्स



मुंबई| प्रतिनिधी: पिंपरी परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन गुन्हेगारांना पकडण्यासाठी अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री उशिरा सापळा लावला. एका गुन्हेगाराला पकडल्यानंतर पळून जाणाऱ्या दुसऱ्या गुन्हेगाराला पाठलाग करून पकडत असताना गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा धक्का बसला. त्यात त्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. जावेद बागसिराज असे मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. जावेद बागसिराज यांचे कुटुंब मूळचे कर्नाटक राज्यातील आहेत. त्यांचे वडील पुणे शहरात आले होते. त्यांचा जन्म पुणे शहरात झाला. ते २०१० मध्ये पुणे शहर पोलीस दलात भरती झाले होते. सुरुवातीला आठ वर्ष पुणे पोलीस दलातील हडपसर, मुंढवा पोलीस ठाण्यांत सेवा केली. २०१८ मध्ये पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय सुरु झाल्यानंतर ते पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात आले.

इथे त्यांनी सुरुवातीला पिंपरी आणि त्यानंतर गुन्हे शाखेत काम केले. सध्या ते गुन्हे शाखेच्या अँटी नार्कोटिक्स सेल मध्ये कार्यरत होते.रविवारी रात्री उशिरा जावेद यांना एक टीप मिळाली. संशयित दोघेजण संत तुकाराम नगर येथे एमडी ड्रग्ज विक्रीसाठी येणार आहेत. त्यानुसार त्यांनी वरिष्ठांना याबाबत माहिती देऊन संत तुकाराम नगर मधील आंतरिक सोसायटी जवळ सापळा लावला. एमडी विक्रीसाठी आलेल्या एकाला त्यांनी पकडले. दरम्यान, पकडलेल्या संशयित आरोपीचा दुसरा साथीदार पळून जाऊ लागला. त्याला पकडण्यासाठी जावेद हे त्याच्या मागे धावले. धावत असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र कळ आली आणि ते खाली कोसळले.जावेद यांच्या सहकाऱ्यांच्या ही बाब लक्षात येताच त्यांना तात्काळ पिंपरी मधील वायसीएम रुग्णालयात दाखल केले. त्याचवेळी त्यांना आणखी एक हृदयविकाराचा धक्का बसला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

जावेद यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, १२ वर्षांची एक मुलगी आणि ७ वर्षांचा एक मुलगा असा परिवार आहे. जावेद यांचा दफनविधी कसबा येथील कब्रिस्तान येथे सोमवारी दुपारी झाला. जावेद हे अतिशय कष्टाळू होते. त्यांचे काम वाखणण्याजोगे असल्याच्या भावना वरिष्ठ अधिकारी व्यक्त करत आहेत. पिंपरी परिसरात अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन गुन्हेगारांना पकडण्यासाठी अमली पदार्थ विरोधी पथकाने रविवारी (२५ ऑक्टोबर) रात्री उशिरा सापळा लावला. एका गुन्हेगाराला पकडल्यानंतर पळून जाणाऱ्या दुसऱ्या गुन्हेगाराला पाठलाग करून पकडत असताना गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्याला हृदयविकाराचा धक्का बसला. त्यात त्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. यामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. जावेद बागसिराज असे मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. जावेद बागसिराज यांचे कुटुंब मूळचे कर्नाटक राज्यातील आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

"मेगावॅट निर्माण करता की महाराष्ट्राची मेगा वाट लावता?"

टोरेंट पॉवर प्रकल्पावरून आदित्य ठाकरे संतापले!

जन सम्राट टाईम्स

कर्जत। प्रतिनिधी: विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका मांडत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी प्रस्तावित टोरेंट पॉवर प्रकल्पावरून राज्य सरकारला लक्ष्य केले. "मेगावॅट निर्माण करता की महाराष्ट्राची मेगा वाट लावता?" असा थेट सवाल करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारवर जोरदार टीका केली. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित प्रकल्पासाठी झालेल्या वृक्षतोडीच्या ठिकाणी आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आणि पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पाहणी केली. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनीही प्रकल्पाला विरोध दर्शविला. विकास हवा; पण निसर्गाचा विनाश नको! कर्जत-भीमाशंकर परिसरातील प्रस्तावित टोरेंट पॉवर प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होण्याची भीती पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. प्रकल्पासाठी सुमारे ५० हजार झाडे तोडली जाणार असल्याचा उल्लेख यापूर्वी करण्यात आला होता. तर आदित्य ठाकरे यांनी जंगलातील सहा ते सात लाख झाडे तोडली जाण्याचा दावा केला. या आकडेवारीबाबत अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या विरोधात स्थानिक नागरिक



आणि पर्यावरणप्रेमींनी आवाज उठविल्यानंतर वृक्षतोडीचा मुद्दा चर्चेत आला. पाहणीदरम्यान आदित्य ठाकरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. स्थानिकांच्या संमतीशिवाय आणि पर्यावरणीय परिणामांचा सखोल विचार न करता विकास प्रकल्प राबवू नयेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. "विकासाला आमचा विरोध नाही; मात्र विकास शाश्वत आणि स्थानिकांच्या हिताचा असला पाहिजे," असे सांगत त्यांनी प्रकल्पाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले. निसर्गाचा समतोल बिघडवून आणि जंगलाचे नुकसान करून विकास साधण्याच्या दृष्टिकोनावर त्यांनी टीका केली. झाडांच्या नोंदींबाबत पारदर्शकतेची मागणी प्रकल्प परिसरातील वृक्षतोडीच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, काही झाडांना क्रमांक देण्यात आले आहेत, तर काही झाडांबाबत नोंदी स्पष्ट नसल्याचा त्यांचा दावा आहे. जंगलातील नैसर्गिक झाडांचे पर्यावरणीय महत्त्व मोठे असून, त्यांची जागा केवळ नव्याने झाडे लावून भरून काढता येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. या प्रकल्पाबाबत स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेऊन समोरासमोर पारदर्शक जनसुनावणी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. प्रकल्पाचे पर्यावरणावर होणारे परिणाम, वृक्षतोडीची वास्तविक व्याप्ती आणि स्थानिकांच्या जीवनावर होणारे संभाव्य परिणाम यांची स्पष्ट माहिती नागरिकांसमोर ठेवली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. "सरकारला जनतेच्या प्रश्नांपेक्षा उद्योगांची चिंता?" राज्यात पाणीटंचाई आणि दुष्काळासारख्या समस्या चर्चेत असताना मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीला परवानगी देण्याच्या भूमिकेवरही आदित्य ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केले. सरकारकडून जनतेसमोर चुकीचे चित्र उभे केले जात असल्याचा आरोप करत त्यांनी कथित प्रचारासाठी मोठा खर्च होत असल्याचा टोला लगावला. स्थानिक आमदारांच्या भूमिकेवरही त्यांनी टीका केली. उद्योगांमध्ये रस दाखविण्याबरोबरच स्थानिक जनतेच्या प्रश्नांबाबतही तितकीच संवेदनशीलता दाखविली पाहिजे, असे ते म्हणाले. ही राजवट लोकविरोधी असल्याचा आरोप करत जनताच योग्य वेळी त्याला उत्तर देईल, असेही त्यांनी नमूद केले

नांद येथे महर्षी वाल्मिकी जयंती महोत्सव संपन्न

न्याय्य मागण्यांसाठी आमदार संजय मेश्राम यांना नागपुरे सरांचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

नांद (उमरेड) । प्रतिनिधी : येथील समाज मंदिर, ढिवर मोहल्ला येथे श्री महर्षी वाल्मिकी जयंती उत्सव समिती, नांद तर्फे सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दर्शविणारे उमरेड क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम यांना शिक्षण सेवक कृती समिती, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष नागपुरे सर (कार्यरत: जि.प. नागपूर) यांनी शिक्षण सेवकांच्या विविध प्रलंबित व न्याय्य मागण्यांचे निवेदन सादर केले. = या विशेष प्रसंगी कार्यक्रमाचे सहउद्घाटक म्हणून आमदार संजय मेश्राम उपस्थित होते. त्यांच्याकडे शिक्षण सेवकांनी आपल्या विविध मागण्यांचे गाऱ्हाणे मांडले. आमदार संजय मेश्राम यांना सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने खालील मागण्यांवर प्रकाश टाकण्यात आला: १) कायमस्वरूपी शिक्षक म्हणून नियुक्ती व लिखित आश्वासन: शिक्षण सेवकांचा सध्याचा सेवा कालावधी कमी करून त्यांना थेट कायमस्वरूपी शिक्षक म्हणून नियुक्त करण्यात यावे. या संदर्भातील मागणी आगामी हिवाळी अधिवेशनात शिक्षण मंत्र्यांकडून लिखित स्वरूपात मंजूर करून घ्यावी. २) २०,००० रुपयांची अतिरिक्त मानधन वाढ: सध्याची वाढती महागाई पाहता शिक्षण सेवकांचे मानधन अत्यंत अपुरे आहे, त्यामुळे त्यांच्या मासिक मानधनात तातडीने २०,००० रुपयांची अतिरिक्त वाढ करण्यात यावी. ३) रुजू दिवसापासून शासकीय कर्मचाऱ्यांचे लाभ: शिक्षण सेवकांना त्यांच्या सेवेच्या पहिल्या दिवसापासूनच इतर पूर्णवेळ शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व सेवा-सुविधा, भत्ते व इतर लाभ लागू



करण्यात यावेत. ४) 'टॅट' (TAIT २०२५-२६) गुणवंत उमेदवारांवरील अन्याय दूर करा: शासनाच्या चुकीच्या व विस्कळीत जाहिरात प्रकाशनामुळे 'टॅट' परीक्षेत उच्च गुण मिळवूनही अनेक उमेदवारांना नाईलाजाने मिळेल त्या खालच्या वर्गावर नोकरी स्वीकारावी लागली, तर दुसरीकडे कमी गुण असणाऱ्या उमेदवारांना वरच्या वर्गावर नियुक्ती मिळाली आहे. हा विसंगत अन्याय दूर करण्यासाठी पहिल्या टप्प्यातील उमेदवारांना दुसऱ्या टप्प्यात पुन्हा अर्ज करण्याची कायदेशीर संधी देण्यात यावी. (कमी गुण घेणारा उपजिल्हाधिकारी तर जास्त गुण घेणारा नायब तहसीलदार कधी होतो का?) मान्यवरांची उपस्थिती व ग्वाही: हा सोहळा सेवानिवृत्त न्यायाधीश चंद्रलालजी मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र जनाधिकार संघर्ष सेनेचे राहुलजी पडोळे यांच्या प्रमुख अतिथ्यतेखाली संपन्न झाला. या वेळी जि.प. हायस्कूल नांद येथील शिक्षिका व सत्कारमूर्ती मा. श्रीमती वनिताताई रवींद्रजी पडगीलवार यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक शंकर नागपुरे सर, गजेंद्रजी चाचेरकर, संजयजी केवट, दीपकजी वाघमारे, रवींद्रभाऊ शेंडे, शंकरजी डडमल, तसेच नांद ग्रामपंचायतीच्या सरपंच शितलताई राजुरकर, उपसरपंच मोहनजी धारणे, आशिषजी शिवरकर, विलासजी रुईकर व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थित होते. महर्षी वाल्मिकी जयंतीच्या पवित्र प्रसंगी निवेदन स्वीकारल्यानंतर आमदार संजय मेश्राम यांनी मागण्यांचे गांभीर्य लक्षात घेत, येत्या हिवाळी अधिवेशनात शिक्षण मंत्री आणि राज्य शासनाकडे यावर लिखित स्वरूपात ठोस पाठपुरावा करून शिक्षण सेवकांना व अन्यायग्रस्त सुशिक्षित बेरोजगारांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. येथील समाज मंदिर, ढिवर मोहल्ला येथे श्री महर्षी वाल्मिकी जयंती उत्सव समिती, नांद तर्फे सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी भव्य जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती दर्शविणारे उमरेड क्षेत्राचे आमदार संजय मेश्राम यांना शिक्षण सेवक कृती समिती, महाराष्ट्र राज्यचे अध्यक्ष नागपुरे सर (कार्यरत: जि.प. नागपूर) यांनी शिक्षण सेवकांच्या विविध प्रलंबित व न्याय्य मागण्यांचे निवेदन सादर केले. = या विशेष प्रसंगी कार्यक्रमाचे सहउद्घाटक म्हणून आमदार संजय मेश्राम उपस्थित होते. त्यांच्याकडे शिक्षण सेवकांनी आपल्या विविध मागण्यांचे गाऱ्हाणे मांडले. आमदार संजय मेश्राम यांना सादर केलेल्या निवेदनात प्रामुख्याने खालील मागण्यांवर प्रकाश टाकण्यात आला

संपादकीय

श्वासावर घाला! विकासाच्या नावाखाली जंगलांचा बळी किती दिवस?

विकास हवा, वीज हवी, उद्योग हवेत; पण त्यासाठी निसर्गाचा श्वासच कोंडायचा का? प्रगतीच्या नावाखाली जंगलांचा विनाश करून आपण नेमके कोणते भविष्य उभारत आहोत, हा प्रश्न आज महाराष्ट्रासमोर उभा आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आणि पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर परिसरातील जंगलांमध्ये टोरंट पॉवरच्या प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या आरोपांनी पर्यावरणप्रेमी, स्थानिक ग्रामस्थ आणि आदिवासी बांधवांमध्ये चिंता निर्माण केली आहे.

या प्रकल्पासाठी ३२ हजारांहून अधिक झाडे तोडली जात असल्याचा दावा केला जात आहे. एवढेच नव्हे, तर प्रकल्पामुळे अडीच लाखांहून अधिक झाडांना धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. हे आरोप कितपत खरे आहेत, वृक्षतोडीला नेमकी कोणती परवानगी देण्यात आली आहे आणि पर्यावरणीय अटींचे पालन होत आहे का, या प्रश्नांची उत्तरे सरकारने स्पष्टपणे दिली पाहिजेत. जंगल म्हणजे केवळ झाडांची गर्दी नव्हे. जंगल ही एक जिवंत परिसंस्था आहे. असंख्य पक्षी, वन्यजीव, कीटक, सरपटणारे प्राणी आणि सूक्ष्मजीव यांचे ते घर असते. झाडांच्या मुळांमुळे मातीची धूप रोखली जाते, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते आणि स्थानिक जलस्रोतांचे अस्तित्व टिकून राहते. जंगल नष्ट झाले की केवळ हिरवळ कमी होत नाही; तर संपूर्ण पर्यावरणीय साखळी विस्कळीत होण्याचा धोका निर्माण होतो. कर्जत–भीमाशंकर पट्ट्यातील वृक्षतोडीचा प्रश्न त्यामुळे केवळ एका प्रकल्पापुरता मर्यादित नाही. तो भविष्यातील पाणी, जैवविविधता, हवामान आणि मानवी जीवनाशी जोडलेला आहे. ३२ हजार झाडांचा प्रश्न; आकड्यांमागचे सत्य समोर येऊ द्या! उपलब्ध माहितीनुसार, कर्जत परिसरात टोरंट पॉवरकडून सुमारे ४३०० मेगावॅट क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प उभारण्याची योजना आहे. या प्रकल्पासाठी वनविभागाकडून सुमारे ६०० एकर जागा देण्यात आल्याचे आणि आणखी १५० एकर खासगी जमीन संपादित केली जाणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या प्रकल्पासाठी किती झाडे तोडण्याची अधिकृत परवानगी देण्यात आली आहे, प्रत्यक्षात किती झाडे तोडली गेली आहेत आणि किती क्षेत्रावर परिणाम होणार आहे, याची अधिकृत व पारदर्शक माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. ३२ हजारांहून अधिक झाडांच्या कत्तलीचा आरोप आणि अडीच लाखांहून अधिक झाडांना संभाव्य धोका, हे दावे गंभीर आहेत. त्यांची केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या चौकटीत चर्चा होऊन चालणार नाही. प्रत्यक्ष पाहणी, वृक्षगणना, वनक्षेत्राची नोंद, मंजूर आराखडे आणि पर्यावरणीय परवानग्यांच्या आधारे सत्य पडताळले गेले पाहिजे. आकडे अतिशयोक्तीपूर्ण असतील, तर तेही स्पष्ट झाले पाहिजे; आणि वृक्षतोडीचे आरोप वस्तुस्थितीवर आधारित असतील, तर जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. पर्यावरणाचा प्रश्न भावनिक घोषणांपुरता न ठेवता तथ्यांच्या आधारे सोडवणे हीच लोकशाहीची जबाबदारी आहे. या प्रकल्पाच्या चर्चेत सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्थानिक ग्रामस्थ आणि आदिवासी समुदायांचे जीवन. जंगलाशी त्यांचे नाते केवळ भावनिक नाही; ते त्यांच्या दैनंदिन जगण्याचा भाग आहे. जंगलातून मिळणारी नैसर्गिक साधनसंपत्ती, पाण्याचे स्रोत, शेतीला आधार देणारे पर्यावरण आणि पारंपरिक जीवनपद्धती या सर्वांचा जंगलाशी थेट संबंध आहे. वृक्षतोडीमुळे या व्यवस्थेवर परिणाम झाला, तर त्याची किंमत स्थानिक नागरिकांना दीर्घकाळ मोजावी लागू शकते. ग्रामस्थांना विश्वासात न घेता वृक्षतोड होत असल्याचा आणि विरोध करणाऱ्यांवर दबाव आणला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या आरोपांची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. स्थानिकांच्या शंका ऐकून घेणे, त्यांना प्रकल्पाची माहिती उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या हरकतींची नोंद घेणे, ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी आहे. नागरिकांचा सहभाग नसेल, तर तो विकास लोकाभिमुख कसा म्हणता येईल? प्रकल्पामुळे पेज नदीच्या प्रवाहावर, परिसरातील जलस्रोतांवर आणि पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

लोकवर्गणीतून कचरा घंटागाडीचा उपक्रम; भैय्या उर्फ ज्ञानेश्वर पाटील यांचा पुढाकार

युवा पिढीही उपक्रमाच्या यशस्वितेसाठी उत्सुक

जन सम्राट टाईम्स

पहाण, | प्रतिनिधी : गावातील स्वच्छता राखण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने पहाण येथे भैय्या उर्फ ज्ञानेश्वर पाटील यांच्या पुढाकारातून लोकवर्गणीच्या माध्यमातून कचरा घंटागाडी सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे गावातील कचरा संकलनाला चालना मिळण्यास मदत होणार असून, गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडणार आहे. लोकसहभागातून स्वच्छ गावाचा संकल्प गावाच्या विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकवर्गणीच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्याचा पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाला संपूर्ण गावातील नागरिकांनी साथ देऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गावातील युवा पिढीही या उपक्रमाबाबत उत्सुक असून, स्वच्छतेच्या कामात सक्रिय सहभाग घेण्याची तयारी दर्शवत आहे. ग्रामस्थांचे



सहकार्य आणि युवकांचा सहभाग यांच्या बळावर कचरा घंटागाडीचा उपक्रम प्रभावीपणे राबविता येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. ग्रामस्थांच्या एकजुटीतून स्वच्छतेला बळ गावातील स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. लोकवर्गणीतून सुरू करण्यात येणारा हा उपक्रम गावातील एकजूट आणि सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरण्याची अपेक्षा आहे. ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गावातील स्वच्छता राखण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने पहाण येथे भैय्या उर्फ ज्ञानेश्वर पाटील यांच्या पुढाकारातून लोकवर्गणीच्या माध्यमातून कचरा घंटागाडी सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे गावातील कचरा संकलनाला चालना मिळण्यास मदत होणार असून, गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडणार आहे.
लोकसहभागातून स्वच्छ गावाचा संकल्प गावाच्या विकासासाठी आणि स्वच्छतेसाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकवर्गणीच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्याचा पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाला संपूर्ण गावातील नागरिकांनी साथ देऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गावातील युवा पिढीही या उपक्रमाबाबत उत्सुक असून, स्वच्छतेच्या कामात सक्रिय सहभाग घेण्याची तयारी दर्शवत आहे. ग्रामस्थांच्या एकजुटीतून स्वच्छतेला बळ गावातील स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. लोकवर्गणीतून सुरू करण्यात येणारा हा उपक्रम गावातील एकजूट आणि सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरण्याची अपेक्षा आहे. ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. गावातील स्वच्छता राखण्यासाठी आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने पहाण येथे भैय्या उर्फ ज्ञानेश्वर पाटील यांच्या पुढाकारातून लोकवर्गणीच्या माध्यमातून कचरा घंटागाडी सुरू करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

आझाद समाज पार्टीची महाराष्ट्र राज्यस्तरीय समीक्षा बैठक !

जन सम्राट टाईम्स

कर्जत | प्रतिनिधी : आझाद समाज पार्टी (काशीराम) ची महाराष्ट्र राज्यस्तरीय समीक्षा बैठक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कर्जत, जिल्हा रायगड येथे उत्साहात पार पडली. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पक्षाच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध संघटनात्मक, सामाजिक आणि राजकीय उपक्रमांचा सविस्तर आढावा जिल्हाध्यक्ष विजय देवराव शिनगारे यांनी सादर केला. जिल्ह्यात संघटन बांधणीसह विविध उपक्रम १२ मार्च २०२६ रोजी दिल्ली येथे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा खासदार भाई चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली पक्षात प्रवेश केल्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात संघटन मजबूत करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये पक्ष संघटनेची बांधणी, नवीन कार्यकर्त्यांचे पक्षप्रवेश, संघटनात्मक बैठका, आंदोलने, शाखांचे उद्घाटन तसेच विविध सामाजिक आणि राजकीय उपक्रमांचा समावेश होता. या सर्व कार्याचा सविस्तर समीक्षा अहवाल जिल्हाध्यक्ष विजय देवराव शिनगारे यांनी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मनीष भाई साठे आणि महाराष्ट्र प्रदेश



कमिटीसमोर मांडला. संघटन अधिक मजबूत करण्याच्या सूचना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कार्याची प्रदेश कमिटीने दखल घेत कौतुक केले. तसेच आगामी काळात पक्षाचे संघटन अधिक मजबूत करणे, कार्याचा विस्तार करणे आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविणे यासंदर्भात सूचना देण्यात आल्या. प्रदेशातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती या राज्यस्तरीय समीक्षा बैठकीस महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे पदाधिकारी, विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष तसेच पक्षाचे जबाबदार कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत राज्यातील पक्षाच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेऊन आगामी वाटचालीसंदर्भात चर्चा करण्यात आली.

मालमत्ता करात डिसेंबरअखेरपर्यंत ३ टक्के सूट; जानेवारीपासून थकीत करावर दंड!

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जळगाव महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून पिंप्राळा परिसरातील निमखेडी शाळेत विशेष करवसुली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अवघ्या चार तासांत २ लाख ८ हजार रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला. दरम्यान, नागरिकांना डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत मालमत्ता कर भरण्यावर ३ टक्के सूट मिळणार असून, जानेवारी २०२७ पासून थकीत करावर दरमहा २ टक्के दंड आकारला जाणार आहे. चार तासांत ३० मिळकतधारकांचा प्रतिसाद महापालिकेच्या महसुलात वाढ व्हावी आणि नागरिकांना मालमत्ता कर भरणे अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने पिंप्राळा परिसरात या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
सकाळी १० ते दुपारी २ या चार तासांच्या कालावधीत झालेल्या शिबिरात परिसरातील ३० मिळकतधारकांनी सहभाग नोंदवत मालमत्ता कराचा भरणा केला. या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत २ लाख ८ हजार रुपयांचा महसूल जमा झाला. वेळेत कर भरा, दंड टाळा! मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत ३ टक्के सवलतीचा लाभ घेता येणार आहे. मात्र, जानेवारी २०२७ पासून थकीत मालमत्ता करावर दरमहा २ टक्के दंड आकारण्यास सुरुवात होणार असल्याने नागरिकांनी मुदतीत कर भरावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी उपलब्ध सवलतीचा लाभ घेत मालमत्ता कराचा भरणा वेळेत करावा, जेणेकरून अतिरिक्त दंडाचा आर्थिक भार टाळता येईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. जळगाव महानगरपालिकेतर्फे मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून पिंप्राळा परिसरातील निमखेडी शाळेत विशेष करवसुली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अवघ्या चार तासांत २ लाख ८ हजार रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला. दरम्यान, नागरिकांना डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत मालमत्ता कर भरण्यावर ३ टक्के सूट मिळणार असून, जानेवारी २०२७ पासून थकीत करावर दरमहा २ टक्के दंड आकारला जाणार आहे. चार तासांत ३० मिळकतधारकांचा प्रतिसाद महापालिकेच्या महसुलात वाढ व्हावी आणि नागरिकांना मालमत्ता कर भरणे अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने पिंप्राळा परिसरात या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी २ या चार तासांच्या कालावधीत झालेल्या शिबिरात परिसरातील ३० मिळकतधारकांनी सहभाग नोंदवत मालमत्ता कराचा भरणा केला. या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत २ लाख ८ हजार रुपयांचा महसूल जमा झाला.

गोवा शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये हर्षल आल्पे यांना 'सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शक' पुरस्कार!

'योगायोग' लघुपटाने पटकावला मानाचा पुरस्कार; मराठी चित्रपटसृष्टीसाठी अभिमानाची बाब

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी : फेस्टिव्हल २०२६ मध्ये 'योगायोग' या मराठी लघुपटासाठी लेखक-दिग्दर्शक हर्षल आल्पे यांना 'सर्वोत्कृष्ट मराठी दिग्दर्शक' (Best Marathi Director) हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. महोत्सवाच्या अधिकृत पुरस्कार विजेत्यांच्या यादीत 'योगायोग' या लघुपटाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या यशामुळे हर्षल आल्पे यांच्या कलात्मक प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला असून, मराठी लघुपट क्षेत्रासाठी ही अभिमानाची



बाब ठरली आहे. 'योगायोग'च्या कथनशैलीची विशेष दखल 'योगायोग' या लघुपटाचे लेखन आणि दिग्दर्शन हर्षल आल्पे यांनी केले आहे. या चित्रपटाच्या निर्मितीत स्मिता आल्पे आणि पं. विनोदभूषण आल्पे यांचे योगदान आहे. कथाकथनातील वेगळेपणा, दिग्दर्शनाची स्वतंत्र शैली आणि मानवी नात्यांमधील गुंतागुंतीवर भाष्य करणाऱ्या आशयामुळे या लघुपटाने लक्ष वेधून घेतले आहे. गोवा शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमधील पुरस्कारामुळे 'योगायोग'च्या यशात आणखी एका मानाच्या पुरस्काराची भर पडली आहे. यापूर्वीही 'योगायोग'चा गौरव हर्षल आल्पे हे लेखन आणि दिग्दर्शन क्षेत्रात कार्यरत असून, 'योगायोग' या लघुपटाने यापूर्वीही विविध स्तरांवर लक्ष वेधून घेतले आहे. या चित्रपटाला पुणे शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (नॅरेटिव्ह)' हा पुरस्कार मिळाला होता. तसेच अलिबाग शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमध्येही या लघुपटाची स्क्रीनिंगसाठी निवड झाली होती.
आता गोवा शॉर्ट फिल्म फेस्टिव्हलमधील पुरस्कारामुळे 'योगायोग'च्या प्रवासात आणखी एक महत्त्वपूर्ण यश जोडले गेले आहे. मराठी लघुपटांच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने हर्षल आल्पे यांची वाटचाल सुरू असून, त्यांच्या या यशाचे चित्रपट क्षेत्रातून स्वागत होत आहे. चित्रपटाच्या टीमचे अभिनंदन 'योगायोग'ला मिळालेल्या या पुरस्काराबद्दल चित्रपटाच्या संपूर्ण टीमचे चित्रपटप्रेमी, कलाक्षेत्रातील मान्यवर आणि मित्रपरिवाराकडून अभिनंदन करण्यात येत आहे. या यशामुळे मराठी लघुपटांच्या सर्जनशीलतेला आणि नव्या प्रयोगशील दिग्दर्शकांच्या कामाला प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

धरणगावचे डॉ. प्रभाकर पाटील यांना मानद डॉक्टरेटने सन्मानित

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली | प्रतिनिधी : धरणगाव येथे कार्यरत असलेले आणि जळगाव जिल्ह्यातील आव्हाणे गावचे मूळ रहिवासी डॉ. प्रभाकर नारायण पाटील यांना मानद डॉक्टरेट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रेस्टीजियस पीस अवॉर्ड कौन्सिलतर्फे ब्रह्मांड, सूर्य, चंद्र आणि ताऱ्यांची निर्मिती कशी झाली, या विषयावरील त्यांच्या संशोधनाची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित 'भाव संवाद' समारोहात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संशोधन कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल पश्चिम दिल्लीतील मेपल गोल्ड रेडिसन ब्ल्यू येथे हा समारोह आयोजित करण्यात आला होता. शिक्षण, समाजसेवा, व्यवसाय आणि इतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सुमारे ६० व्यक्तिमत्त्वांना या कार्यक्रमात विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. समाजातील विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाची दखल घेणे, त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देणे आणि इतरांनाही समाज व राष्ट्राच्या विकासासाठी प्रेरित करणे, हा या समारोहाचा मुख्य उद्देश होता. विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव या समारोहात मानद डॉक्टरेट पुरस्कारासह समाजसेवा पुरस्कार, बिझनेस आयकॉन पुरस्कार, राष्ट्रीय शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार आणि भारत प्रेरणा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

नांदगावमध्ये 22व्या वर्षावास सांगता समारोहाची धम्ममय वातावरणात सांगता

आर्याजी धम्मज्योती यांची धम्मदेशना; धम्मसेवा व सामाजिक कार्यासाठी मान्यवरांना 'धम्मभूषण' पुरस्काराने सन्मानित

जन सम्राट टाईम्स

नांदगाव । प्रतिनिधी: नांदगाव येथील छत्रपती संभाजीनगर रोडवरील सारनाथ बुद्ध विहारात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा नांदगाव, सुजाता महिला मंडळ आणि सारनाथ बुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २२व्या वर्षावास (पवारणा) सांगता समारोहाची २४ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्ममय, मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. तीन महिन्यांच्या वर्षावासाच्या समारोपानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, भोजनदान, धम्मदेशना आणि धम्मभूषण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांच्या उपस्थितीत धम्मकार्यक्रम आषाढ पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत चाललेल्या या २२व्या वर्षावासात पूजनीय भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांच्या उपस्थितीत विविध धम्मविषयक उपक्रम राबविण्यात आले. वर्षावासाच्या सांगता समारोहानिमित्त त्रिरत्नांना अनुसरून विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पूजनीय आर्याजी यांना वंदना आणि भोजनदान अर्पण करण्यात आले. त्यानंतर दुपारी १२ ते १.३० या वेळेत धम्मभूषण पुरस्कार वितरण सोहळा आणि पूजनीय आर्याजी धम्मज्योती यांची विशेष धम्मदेशना पार पडली. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व उपासक-उपासिकांसाठी भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्याला पांढऱ्या शुभ्र वस्त्रांमध्ये मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते. संपूर्ण परिसरात श्रद्धा, मैत्री, करुणा आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले होते. धम्मसेवा आणि सामाजिक कार्यासाठी 'धम्मभूषण' पुरस्कार धम्मप्रसार, धम्मसेवा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल मान्यवरांना 'धम्मभूषण'



पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये आयु. जी. एम. साबळे, आयु. अशोक बागुल, आयु. रोहिणी जाधव आणि आयु. डॉ. अर्चना यांचा समावेश होता. या पुरस्कारांमुळे धम्मकार्य आणि सामाजिक सेवेतील योगदानाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला मुंबई, इगतपुरी, नाशिक, नांदगाव आणि मनमाड परिसरातील असंख्य बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते. पंचशील, अष्टशील आणि वर्षावासाच्या पुण्याचे महत्त्व धम्मदेशनेदरम्यान पूजनीय भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांनी पंचशील, अष्टशीलाचे महत्त्व आणि वर्षावासाच्या पुण्यपरंपरेविषयी मार्गदर्शन केले. शील, सदाचार, करुणा, अहिंसा आणि मैत्री या मूल्यांचे आचरण दैनंदिन जीवनात करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. वर्षावासानंतरचा कालावधी चीवरदानासाठीही महत्त्वाचा असतो. नांदगावच्या सारनाथ बुद्ध विहारात गेल्या २२ वर्षांपासून ही धम्मपरंपरा अखंड सुरू असल्याने स्थानिक धम्मचळवळीच्या दृष्टीने हा गौरवाचा विषय ठरत आहे. आयोजनासाठी पदाधिकाऱ्यांचे परिश्रम या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्ष म्हणून आयु. निर्मलाताई केदारे यांनी जबाबदारी सांभाळली. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा नांदगाव, सुजाता महिला मंडळ आणि सारनाथ बुद्ध विहार समितीच्या कुशल कर्मांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. पवारणा दिन : क्षमा, मैत्री आणि आत्मपरीक्षणाचा संदेश वर्षावासाच्या सांगतेशी संबंधित पवारणा दिनाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी भिक्खू संघातील सदस्य परस्परांना आपल्या वर्तनातील त्रुटींबाबत सांगण्याची संधी देतात. हा विनय, आत्मपरीक्षण, क्षमाशीलता आणि मैत्रीभाव यांचा आदर्श मानला जातो. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. पवारणा दिनाच्या या मंगलप्रसंगी उपस्थित धम्मबांधवांना मंगलकामना देण्यात आल्या. "भवतु सब्ब मंगलम्! साधू! साधू!! साधू!!!" या मंगलघोषात २२व्या वर्षावास सांगता समारोहाची सांगता झाली.नांदगाव येथील छत्रपती संभाजीनगर रोडवरील सारनाथ बुद्ध विहारात दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया शाखा नांदगाव, सुजाता महिला मंडळ आणि सारनाथ बुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २२व्या वर्षावास (पवारणा) सांगता समारोहाची २४ ऑक्टोबर २०२६ रोजी धम्ममय, मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. तीन महिन्यांच्या वर्षावासाच्या समारोपानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, भोजनदान, धम्मदेशना आणि धम्मभूषण पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांच्या उपस्थितीत धम्मकार्यक्रम आषाढ पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत चाललेल्या या २२व्या वर्षावासात पूजनीय भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांच्या उपस्थितीत विविध धम्मविषयक उपक्रम राबविण्यात आले. वर्षावासाच्या सांगता समारोहानिमित्त त्रिरत्नांना अनुसरून विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत पूजनीय आर्याजी यांना वंदना आणि भोजनदान अर्पण करण्यात आले. त्यानंतर दुपारी १२ ते १.३० या वेळेत धम्मभूषण पुरस्कार वितरण सोहळा आणि पूजनीय आर्याजी धम्मज्योती यांची विशेष धम्मदेशना पार पडली. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व उपासक-उपासिकांसाठी भोजनदानाची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्याला पांढऱ्या शुभ्र वस्त्रांमध्ये मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते. संपूर्ण परिसरात श्रद्धा, मैत्री, करुणा आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले होते. धम्मसेवा आणि सामाजिक कार्यासाठी 'धम्मभूषण' पुरस्कार धम्मप्रसार, धम्मसेवा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल मान्यवरांना 'धम्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये आयु. जी. एम. साबळे, आयु. अशोक बागुल, आयु. रोहिणी जाधव आणि आयु. डॉ. अर्चना यांचा समावेश होता. या पुरस्कारांमुळे धम्मकार्य आणि सामाजिक सेवेतील योगदानाचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला मुंबई, इगतपुरी, नाशिक, नांदगाव आणि मनमाड परिसरातील असंख्य बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते. पंचशील, अष्टशील आणि वर्षावासाच्या पुण्याचे महत्त्व धम्मदेशनेदरम्यान पूजनीय भिक्खुणी आर्याजी धम्मज्योती यांनी पंचशील, अष्टशीलाचे महत्त्व आणि वर्षावासाच्या पुण्यपरंपरेविषयी मार्गदर्शन केले. शील, सदाचार, करुणा, अहिंसा आणि मैत्री या मूल्यांचे आचरण दैनंदिन जीवनात करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

अवघ्या तीन महिन्यांत २० बेपत्ता व्यक्तींचा शोध



जन सम्राट टाईम्स

अडावद । प्रतिनिधी : पोलीस ठाण्याच्या हद्दीतून विविध कारणांमुळे बेपत्ता झालेल्या तसेच अपहरण झालेल्या व्यक्तींचा शोध घेण्यात अडावद पोलिसांना यश आले आहे. गेल्या अवघ्या तीन महिन्यांत विशेष शोधमोहीम राबवून पोलिसांनी तब्बल २० व्यक्तींचा शोध घेतला असून, त्यांना सुखरूपपणे त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले आहे. या कामगिरीमुळे अडावद पोलिसांचे परिसरातून कौतुक होत आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि चोपडा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही शोधमोहीम राबविण्यात आली. अडावद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने या प्रकरणांचा तपास केला. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे शोध अपहरणाचे दाखल गुन्हे तसेच बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींचा तपास करण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली होती. तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळांची पाहणी, साक्षीदारांची चौकशी, मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर), तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवली. सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि नियोजनबद्ध तपासामुळे तीन महिन्यांत २० व्यक्तींचा शोध घेण्यात यश आले. यामध्ये अल्पवयीन मुली, महिला आणि पुरुषांचा समावेश असून, त्यांना सुरक्षितपणे नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले. पोलीस पथकातील कर्मचाऱ्यांचा सहभाग या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे यांच्या नेतृत्वाखाली प्रोबेशनरी पोलीस उपनिरीक्षक सचिन नागरे, पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र सोनवणे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनील तायडे, पोलीस हवालदार जयदीप राजपूत, विनोद धनगर, संजय धनगर, शेषराव तोरे, पोलीस कॉन्स्टेबल किरण शिरसाठ, अन्वर तडवी, भूषण चव्हाण आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल दिव्या मराठे यांनी सहभाग घेतला. कुटुंबीयांकडून पोलिसांचे आभार बेपत्ता झालेल्या व्यक्तींचा शोध लागल्याने संबंधित कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. आपल्या प्रियजनांची सुखरूप भेट घडवून आणल्याबद्दल नातेवाइकांनी पोलिसांचे आभार मानले.

धरणगाव रोटरी क्लबचा स्तुत्य शैक्षणिक उपक्रम!

दहावीच्या विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी कार्डचे वितरण

जन सम्राट टाईम्स

धरणगाव। प्रतिनिधी : विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती साधण्यासाठी आणि दहावीच्या परीक्षेत त्यांना उत्तम यश मिळवून देण्यासाठी धरणगाव रोटरी क्लबच्या वतीने स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शहरातील महात्मा फुले हायस्कूलमधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी कार्डचे वितरण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे उपशिक्षक पी. डी. पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक एम. बी. मोरे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे सदस्य आणि महात्मा फुले हायस्कूलचे माजी विद्यार्थी दिनेश माळी उपस्थित होते. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शैक्षणिक ॲपचा लाभ घेण्याचे विद्यार्थ्यांना



आवाहन यावेळी दिनेश माळी यांनी विद्यार्थ्यांना आयडियल स्टडी कार्ड आणि त्यासोबत उपलब्ध असलेल्या शैक्षणिक ॲपची सविस्तर माहिती दिली. ॲपच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या प्रश्नसंचांचा, अभ्यास साहित्याचा आणि मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

नियमित अभ्यास, योग्य नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर दहावीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळवावेत, असे आवाहन त्यांनी केले. १,५०० रुपयांचे शैक्षणिक ॲप केवळ ६५ रुपयांत! धरणगाव रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. मनोज ठाकरे, सचिव रो. सुनील चौधरी, प्रोजेक्ट हेड रो. किरण पाटील, रो. दिनेश माळी आणि क्लबच्या सर्व सदस्यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. या शैक्षणिक स्टडी ॲपची मूळ किंमत १,५०० रुपये अधिक जीएसटी इतकी असताना, धरणगाव शहरातील विद्यार्थ्यांना ते केवळ ६५ रुपयांत उपलब्ध करून देण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनाही आधुनिक शैक्षणिक सुविधांचा लाभ घेता यावा आणि त्यांच्या अभ्यासाला योग्य दिशा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. धरणगाव रोटरी क्लबच्या वतीने दरवर्षी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जातात. रक्तदान शिबिरे, कर्करोग तपासणी शिबिरे, वृक्षारोपण, आरओ वॉटर फिल्टर प्लांटची सुविधा आणि शैक्षणिक साहित्य वाटप अशा उपक्रमांद्वारे क्लब समाजोपयोगी कार्यात योगदान देत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेला आयडियल स्टडी कार्ड वितरणाचा उपक्रम हा रोटरी क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला आहे.

अंबड तालुक्यात अवैध रेती उपशाचा धुमाकूळ; पाणीपातळी खालावल्याचा आरोप!

जन सम्राट टाईम्स

जालना। (प्रतिनिधी): अंबड तालुक्यातील विविध गावांच्या परिसरात अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोप आंबेडकर जन मंचाने केला आहे. नदीपात्रातील बेसुमार उत्खननामुळे पाणीपातळी खालावत असून, जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून अवैध रेती उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांची दखल न घेतल्यास २८ ऑक्टोबरपासून गोरी गांधारी फाट्यावर आमरण उपोषण करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. या संदर्भात आंबेडकर जन मंचाचे मुख्य संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष विलास मस्के, महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मनीषा घोष आणि मराठवाडा महिला आघाडीच्या अध्यक्षा शितल बाळू जमदाडे यांनी २६ ऑक्टोबर २०२६ रोजी अंबडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. दररोज शेकडो वाहनांतून रेतीची



वाहतूक होत असल्याचा दावा निवेदनानुसार, गोंदी, पाथरवाला, कुरण, हसनापूर, बळेगाव, लक्ष्मीआई मंदिर परिसर, बाबाची थडी पाथरवाला, शहागड, गौरी गांधारी, डोमलगाव, साष्टपिंपळगाव आणि आपेगाव या भागांत गेल्या महिनाभरापासून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उपसा सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या परिसरातून दररोज ४०० ते ५०० हायवा आणि सुमारे ३०० ट्रॅक्टरद्वारे रेतीची चोरी होत असल्याचा दावा संघटनेने निवेदनात केला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत असताना संबंधित यंत्रणांकडून प्रभावी कारवाई का होत नाही, तसेच या प्रकाराला कोणाचे अभय आहे, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. उत्खनन झालेल्या ठिकाणांचे पंचनामे करण्याची मागणी अवैध उत्खनन झालेल्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत. तसेच संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून रेती उपसा आणि वाहतुकीवर लक्ष ठेवावे, अशी मागणी आंबेडकर जन मंचाने केली आहे. अवैध उत्खननामुळे जलस्रोतांवर परिणाम होत असल्याचा संघटनेचा आरोप असून, या प्रकरणात महसूल व पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष घालून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. २८ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा अवैध रेती उपशाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यासह निवेदनातील मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास बुधवार, २८ ऑक्टोबर २०२६ पासून गोरी गांधारी फाटा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब मगर, मराठवाडा महिला आघाडीच्या अध्यक्षा शितल जमदाडे यांच्यासह आंबेडकर जन मंचाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे

धरणगावात राष्ट्रसंत मीरा माता जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: धरणगाव येथे राष्ट्रसंत मीरा माता यांच्या जयंतीनिमित्त राजपूत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. इयत्ता दहावी, बारावी, पदविका, पदवी तसेच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोमेंटो व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजपूत समाजाचे अध्यक्ष जीवनसिंह बायस होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष सतीशसिंह जनकवार, सचिव गणेशसिंह सूर्यवंशी, सदस्य गोपालसिंह बायस, नवनियुक्त नगरसेवक नितीनसिंह बायस, गोपालसिंह जनकवार, प्रल्हादसिंह चव्हाण, विजयसिंह जनकवार आणि श्यामसिंह चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत मीरा माता आणि महाराणा



प्रतापसिंह यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या पावन स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विविध शैक्षणिक स्तरांवर तसेच क्रीडा क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना जीवनसिंह बायस यांच्याकडून प्रत्येकी २०० रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. तसेच डॉ. कमलेशसिंह बायस यांच्या वतीने त्यांचे मित्र स्व. लक्ष्मीकांतसिंह सरदारसिंह तोमर परदेशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ इयत्ता दहावी व बारावीमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सत्काराला उत्तर देताना विद्यार्थ्यांमधून युवराज कमलेशसिंह बायस आणि विजयसिंह जनकवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन गणेशसिंह सूर्यवंशी यांनी केले, तर निलेशसिंह जनकवार यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजपुताना फाउंडेशन तसेच महाराणा प्रतापसिंह चौफुलीचे अध्यक्ष प्रथमसिंह सूर्यवंशी यांच्यासह निशांतसिंह बायस, स्वप्नीलसिंह जनकवार, महेशसिंह सूर्यवंशी, निलेशसिंह जनकवार, ज्ञानेश्वरसिंह जनकवार, गोविंदसिंह जनकवार, महेंद्रसिंह चव्हाण, सुरेशसिंह चव्हाण आणि नरेंद्रसिंह जनकवार यांनी सहकार्य केले.

दुष्काळात कामांची दिरंगाई खपवून घेणार नाही

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी: जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच युद्धपातळीवर नियोजन करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आणि शेतकऱ्यांना वीज, चारा व इतर सुविधांसाठी अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. जल जीवन मिशनसह ग्रामीण भागातील अपूर्ण पाणीपुरवठा योजनांची कामे एका महिन्याच्या आत पूर्ण करावीत. तसेच शासनाच्या जलतारा योजनेअंतर्गत जिल्ह्याला ५८ हजार जलतारा निर्मितीचे उद्दिष्ट असले, तरी जिल्ह्यात एक लाख जलतारा निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून नियोजन करावे. विकासकामांमधील दिरंगाई आणि हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिला. पाळधी येथील शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव व धरणगाव तालुक्यांतील विविध विभागांची प्रशासकीय आढावा बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीत महावितरणने २४ तास सतर्क राहावे बैठकीत पाणीपुरवठा, वीज, जलसंधारण, चारा उपलब्धता, पीकविमा, शेती, शेतरस्ते आणि



विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत वीजपुरवठ्यातील अडचणी तातडीने दूर करण्यासाठी महावितरणने ट्रान्सफॉर्मर, केबल, फ्यूज आणि इतर बिघाड दुरुस्त करणारी आपत्कालीन यंत्रणा २४ तास सतर्क ठेवावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. जल जीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करावीत.

पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक असलेल्या प्रलंबित वीजजोडण्यांबाबत महावितरण आणि पाणीपुरवठा विभागाने संयुक्तपणे कार्यवाही करावी. कानळदा-किनोद आणि आव्हाणी-भोकणी दरम्यान नवीन वीज उपकेंद्रे उभारण्यासाठी प्रस्ताव तातडीने सादर करावेत. तसेच पाणीपुरवठा योजनांसाठी आवश्यक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) निधीतून मंजुरी मिळविण्याकरिता प्रस्ताव सादर करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. अपूर्ण बंधारे, नाला खोलीकरण आणि पाझर तलावांच्या कामांना गती जलसंधारण विभागाने अपूर्ण बंधारे, नाला खोलीकरण आणि पाझर तलावांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावीत. नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती प्राधान्याने करावी, जेणेकरून उपलब्ध पाण्याचा अधिक प्रभावी वापर आणि जलसाठा वाढविण्यास मदत होईल, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. जिल्ह्याला जलतारा निर्मितीसाठी ५८ हजारांचे उद्दिष्ट देण्यात आले असले, तरी संभाव्य दुष्काळाचा विचार करून जिल्ह्यात एक लाख जलतारा निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवावे. त्यासाठी आवश्यक नियोजन करून कामाला गती द्यावी, असेही त्यांनी सांगितले. चारा उपलब्धता आणि मूलभूत सुविधांकडे लक्ष द्या संभाव्य चाराटंचाई लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभागाने चारा लागवड आणि उपलब्धतेचे नियोजन करावे. शाळा व अंगणवाड्यांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध राहतील, याची दक्षता घ्यावी. पोषण आहाराच्या गुणवत्तेकडेही विशेष लक्ष द्यावे. ग्रामपंचायती आणि संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

कौटुंबिक वादातून तरुणाची हत्या; मेहुण्याला अटक

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी: जळगाव शहरातील शिवाजीनगर परिसरात कौटुंबिक वादातून झालेल्या हल्ल्यात सनी विनोद डोळे (वय २७, रा. शिवाजीनगर, जळगाव) या तरुणाचा मृत्यू झाला. सोमवारी (२६ ऑक्टोबर) दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी सनीचा मेहुणा सुरज नारायण वानखेडे (रा. कंडारी, ता. भुसावळ) याला पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, डोळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कौटुंबिक वादाचे रूपांतर हल्ल्यात मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सनी डोळे आणि त्याचा मेहुणा सुरज वानखेडे यांच्यात कौटुंबिक कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर पुढे गंभीर हल्ल्यात झाले. यावेळी सुरज याने सनीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यात सनी गंभीर जखमी झाला. रुग्णालयात उपचारापूर्वीच मृत घोषित हल्ल्यानंतर जखमी सनीला तातडीने जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. तरुण मुलाच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे. आजीच्या हातालाही दुखापत या घटनेत सनीची आजी सुमनबाई तायडे यांच्या हातालाही दुखापत झाल्याची माहिती आहे. सनीच्या मृत्यूची बातमी समजताच त्याची आई आणि आजी यांनी रुग्णालयात केलेला आक्रोश उपस्थितांचे मन हेलावून टाकणारा होता. या हृदयद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली.

दुष्काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे : पालकमंत्री

जळगाव व धरणगाव तालुक्यांतील नऊ बंधाऱ्यांसाठी १० कोटी २४ लाखांचा निधी मंजूर

जन सम्राट टाईम्स

जळगाव, । प्रतिनिधी: शेतकरी जेव्हा संकटात सापडतो, तेव्हा शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहते. सध्या दुष्काळी परिस्थिती असली, तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासन बंधारे उभारून पाणीसाठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे; मात्र पाण्याचे संवर्धन करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. शासनाचे प्रयत्न आणि जनतेची साथ यांच्या बळावर दुष्काळावर मात करता येईल, असा विश्वास राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून मंजूर झालेल्या वाकटुकी येथील ७८ लाख रुपये खर्चाच्या सिमेंट काँक्रीट बंधाऱ्याचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यास आणि सिंचनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. नऊ बंधाऱ्यांसाठी १० कोटी २४ लाखांचा निधी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे जलसंधारण महामंडळाच्या माध्यमातून मागील वर्षी जळगाव व धरणगाव तालुक्यांतील नऊ बंधाऱ्यांसाठी सुमारे १० कोटी २४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या बंधाऱ्यांमुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविणे, भूजलपातळी वाढविणे आणि सिंचनक्षेत्राचा विस्तार करणे शक्य होणार आहे.

झिरी नदी परिसरात यापूर्वी उभारण्यात आलेल्या बंधाऱ्यांचा सिंचनासाठी मोठा फायदा झाला आहे. त्याच धर्तीवर वाकटुकी परिसरातील बंधाऱ्यांमुळेही शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. ग्रामस्थांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही संकल्पना लोकचळवळ



म्हणून पुढे न्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. गावांना जोडणारे रस्ते आणि शेतरस्त्यांना प्राधान्य परिसरातील विकासकामांचा आढावा घेताना पालकमंत्री म्हणाले की, गावांना जोडणारे रस्ते, गावांतर्गत रस्ते आणि शेतरस्त्यांच्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी गिरणा धरणातून वेळोवेळी पाण्याची आवर्तने सोडण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गिरणा धरणातून आणखी एक आवर्तन मिळावे, यासाठी प्रयत्न केले जातील. मात्र, हे आवर्तन निश्चितपणे मिळेल, अशी शंभर टक्के खात्री देता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. वाकटुकी येथील आदर्श शाळेचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, वाकटुकी हे टेल एंडचे गाव असले, तरी विकासाच्या दृष्टीने या गावाने हेड एंडचे गाव व्हावे, हा आपला प्रयत्न आहे. जळगाव ग्रामीणच्या विकासाबाबत विश्वास यावेळी भाजप नेते भगवान महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. जळगाव ग्रामीण मतदारसंघाचा बारामतीच्या धर्तीवर विकास होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालन मागासवर्गीय सेना जिल्हाप्रमुख मुकुंद नन्नवरे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, अधिकारी आणि ग्रामस्थांनी केले होते. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला युवा नेते तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, जलसंधारण अधिकारी अमोल पाटील, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रेमराज पाटील, भाजप विधानसभा क्षेत्रप्रमुख चंद्रशेखर अत्तरदे, माजी जिल्हा परिषद सभापती पी. सी. आबा पाटील, शिवसेना उपजिल्हाप्रमुख ॲड. शरद माळी, भाजप तालुकाध्यक्ष दिनेश पाटील, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष जिजाबराव पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख रोहित कोगटा, युवासेना उपजिल्हाप्रमुख पवन पाटील, धरणगाव शहरप्रमुख धीरेंद्रआप्पा पुरभे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे नाटेश्वर पाटील, वैद्यकीय आघाडी तालुका संघटक अजय बाबा पाटील, मागासवर्गीय सेना जिल्हाप्रमुख मुकुंद नन्नवरे, पंचायत समिती सदस्य अनिल पाटील, चांदसरचे सरपंच सचिन पवार, खामखेड्याचे सरपंच धीरज पाटील, पोलीस पाटील गुलाब सोनावणे, उपसरपंच मनोहर कोळी, ज्येष्ठ शिवसैनिक रतन जिभू कोळी आणि शाखाप्रमुख पांडुरंग रघुनाथ कोळी उपस्थित होते. याशिवाय गजानन पाटील, रवींद्र पाटील, संजय पाटील सर, कैलास सोनावणे, दीपक भदाणे, शंकर सावंत, शाहरुख पटेल, रोहित पाटील, मंगेश पाटील, वाल्मिक पाटील, सुजन चव्हाण, जितेंद्र पाटील, किशोर पाटील, रणजित पाटील, मंगलअण्णा पाटील, बाळूभाऊ जाधव, शुभम चव्हाण, सुनील महाराज, नितीन पाटील, लक्ष्मण बापू कोळी, वासुदेव भिका कोळी, आत्माराम उखरडू कोळी, ज्ञानेश्वर आत्माराम कोळी, गणेश काशिनाथ पाटील, चेतन देविदास पाटील आणि सागर कोळी यांच्यासह परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ तसेच शिवसेना-भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी जेव्हा संकटात सापडतो, तेव्हा शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहते.

सध्या दुष्काळी परिस्थिती असली, तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. शासन बंधारे उभारून पाणीसाठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे; मात्र पाण्याचे संवर्धन करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. शासनाचे प्रयत्न आणि जनतेची साथ यांच्या बळावर दुष्काळावर मात करता येईल, असा विश्वास राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून मंजूर झालेल्या वाकटुकी येथील ७८ लाख रुपये खर्चाच्या सिमेंट काँक्रीट बंधाऱ्याचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. या बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्यास आणि सिंचनाला चालना मिळण्यास मदत होणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

गांजाची शेती; ७.६७ कोटींची ३,०६८ किलो गांजाची झाडे नष्ट!



जन सम्राट टाईम्स

शिरपूर, जि. धुळे। प्रतिनिधी : शिरपूर तालुक्यातील अतिदुर्गम महादेव दोंदवाडा परिसरात वनविभागाच्या जमिनीवर सुरू असलेली गांजाची शेती शिरपूर तालुका पोलिसांनी उघडकीस आणली आहे. अनेर डॅम वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या पाच ठिकाणी छापे टाकून पोलिसांनी सुमारे ३ हजार ६८ किलो वजनाची आणि ७ कोटी ६७ लाख रुपये किमतीची गांजाची झाडे जप्त करून जागेवरच नष्ट केली. याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या सहा महिन्यांत शिरपूर तालुक्यात गांजाच्या शेतीसंदर्भात अनेक कारवाया झाल्याची माहिती समोर येत आहे. तरीही पुन्हा मोठ्या प्रमाणात गांजाची लागवड आढळल्याने शिरपूर तालुका गांजामुक्त कधी होणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गोपनीय माहितीवरून पाच ठिकाणी छापे महादेव दोंदवाडा या अतिदुर्गम भागात गांजाची लागवड करण्यात आल्याची गोपनीय माहिती शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित परिसरात शोधमोहीम राबवली. अनेर डॅम वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीतील पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून गांजाची लागवड उघडकीस आणण्यात आली. कारवाईदरम्यान गांजाची झाडे तोडून नष्ट करण्यात आली. या पिकाची अंदाजित किंमत ७ कोटी ६७ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणात नेमकी लागवड कोणी केली, त्यामागे कोणाचे जाळे आहे आणि या व्यवसायात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास सुरू आहे. वारंवार कारवाया, तरी गांजाची शेती सुरूच! शिरपूर तालुक्यात मागील सहा महिन्यांत गांजासंदर्भात अनेक पोलीस कारवाया झाल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतरही दुर्गम भागात मोठ्या प्रमाणावर गांजाची लागवड आढळल्याने या अवैध व्यवसायाला आळा घालण्याचे आव्हान पुन्हा समोर आले आहे. केवळ गांजाची पिके नष्ट करून थांबण्याऐवजी लागवड करणाऱ्यांचा शोध घेणे, त्यांना आर्थिक मदत किंवा अन्य प्रकारे सहकार्य करणाऱ्यांची माहिती मिळवणे आणि अशा ठिकाणी पुन्हा लागवड होणार नाही यासाठी प्रभावी देखरेख ठेवणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. पोलीस, वनविभाग आणि कृषी विभागाच्या संयुक्त कारवाईची गरज अतिदुर्गम भागातील वनजमिनीवर गांजाची लागवड आढळत असल्याने पोलीस प्रशासनासोबत वनविभाग आणि कृषी विभागानेही समन्वयाने काम करण्याची गरज व्यक्त होत आहे.

बालाजींच्या विश्रांतीने रथोत्सवाची सांगता; गरुड परिवारातील १४७ वर्षांची परंपरा कायम!

गरुड बागेत महाआरती व विधिवत पूजा

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी : भगवान बालाजींच्या चार दिवसांच्या रथोत्सवाची गरुड परिवाराकडे विश्रांतीने भक्तिमय वातावरणात सांगता झाली. धुळे शहरात भगवान बालाजींच्या विश्रांतीची गरुड परिवारातील तब्बल १४७ वर्षांची परंपरा आजही श्रद्धेने जपली जात आहे. सकाळी पालखी मिरवणूक काढून भगवान बालाजींना गरुड बागेत आणण्यात आले. तेथे बकुळीच्या झाडाखाली भगवान बालाजी सायंकाळपर्यंत विश्रांती घेत असल्याची परंपरा पार पाडण्यात आली. पांझरा नदीत मूर्तींना स्नान; पालखी मिरवणुकीने गरुड बागेत आगमन धुळे शहरातील गल्ली क्रमांक चारमधील भगवान बालाजी मंदिरातून सकाळी मूर्तींची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पांझरा नदीवर भगवान बालाजींच्या मूर्तींना स्नान घालण्यात आले. नदीकिनाऱ्यावरून पालखी मिरवणूक गरुड बागेत नेण्यात



आली. तेथे महाआरती करून भगवान बालाजींना अन्नपदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. विधिवत पूजा-अर्चा करून संपूर्ण गरुड परिवाराने मनोभावे सेवा केली. बकुळीच्या झाडाखाली विश्रांतीची परंपरा गरुड बागेतील बकुळीच्या झाडाखाली भगवान बालाजी सायंकाळपर्यंत विश्रांती घेत असल्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. यंदाही ही परंपरा भक्तिभावाने पार पाडण्यात आली. सायंकाळपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गरुड परिवारातील या ऐतिहासिक परंपरेला १४७ वर्षे पूर्ण झाली असून, पिढ्यान्‌पिढ्या जपली जाणारी ही धार्मिक परंपरा धुळे शहराच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक ठरत आहे. भगवान बालाजींच्या विश्रांतीनंतर चार दिवसांच्या रथोत्सवाची सांगता झाल्याची माहिती प्रणव गरुड यांनी दिली. गरुड परिवाराची मोठ्या संख्येने उपस्थिती या धार्मिक सोहळ्याला भगवान बालाजी मंदिराचे पुजारी लक्ष्मीकांत काकडा, प्रणव गरुड, देवदत्त गरुड, रूपक गरुड, पुष्कर गरुड, सिद्धनाथ गरुड, रुद्र गरुड, दामिनी गरुड, सायली बापट, सुरभी गरुड, शिवानी गरुड, चिन्मयी गरुड, आश्लेषा गरुड, रंजना खैरनार, अरहात गरुड, हिना चितळे यांच्यासह गरुड परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फॉर्म क्रमांक ७ च्या कथित गैरवापरावरून धुळ्यात राजकीय वाद पेटला!

जन सम्राट टाईम्स

धुळे। (प्रतिनिधी): धुळे शहर विधानसभा मतदारसंघात मतदार यादीतून नावे वगळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म क्रमांक ७ च्या कथित गैरवापरावरून राजकीय वातावरण तापले आहे. भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून या फॉर्मचा गैरवापर करून हजारो मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील नगरसेवकांनी केला आहे. या प्रकरणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना निवेदन देत फॉर्म क्रमांक ७ ची सविस्तर व मतदान केंद्रनिहाय माहिती तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. माहिती न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादीचे नगरसेवक तथा गटनेते शहाबाज शहा यांनी दिला आहे. विशिष्ट भागांतील मतदारांना लक्ष्य केल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी केलेल्या आरोपानुसार, धुळे शहर विधानसभा मतदारसंघातील हजारो मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक ७ चा कथित गैरवापर केला जात आहे. संबंधित मतदार



दिलेल्या पत्त्यावर राहत नाहीत किंवा ते बोगस मतदार आहेत, अशा स्वरूपाचे दावे करून सामूहिकरीत्या अर्ज सादर केले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. मतदारसंघातील विशिष्ट भागांतील किंवा विशिष्ट समुदायांतील मतदारांना लक्ष्य केले जात असल्याचा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. अर्जांची केंद्रनिहाय माहिती देण्याची मागणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात फॉर्म क्रमांक ७ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची सविस्तर माहिती आणि त्यांचा मतदान केंद्रनिहाय तपशील तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. अर्जांमध्ये खोटी माहिती देण्यात आली आहे का, अर्ज सामूहिकरीत्या सादर करण्यात आले आहेत का आणि त्यामागे कोणाचा सहभाग आहे, याची चौकशी करण्याची मागणीही राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी केली आहे. खोट्या माहितीच्या आधारे अर्ज सादर केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन पारदर्शक माहिती उपलब्ध करून द्यावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शहाबाज शहा यांनी दिला. निवडणूक प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष प्रक्रियेत पारदर्शकता राखणे आणि पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार सुरक्षित ठेवणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रवादीने केलेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रशासनाकडून काय भूमिका घेतली जाते आणि अर्जांच्या पडताळणीत काय निष्पन्न होते, याकडे आता लक्ष लागले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक तथा गटनेते शहाबाज शहा, डॉ. सर्फराज अन्सारी यांच्यासह पक्षाचे नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गाढोदे येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे अठरावे पुष्प संपन्न!

जन सम्राट टाईम्स

गाढोदे, ता. जळगाव । प्रतिनिधी: भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे अठरावे पुष्प गाढोदे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते आयु. अशोक तिडके यांनी 'चक्रवर्ती सम्राट अशोक यांचे महान धम्मकार्य' या विषयावर अभ्यासपूर्ण प्रबोधन करत सम्राट अशोक यांच्या जीवनातील परिवर्तन, धम्मप्रसार आणि लोककल्याणकारी कार्याचा इतिहास उपस्थितांसमोर मांडला. कलिंग युद्धानंतर सम्राट अशोक यांच्या जीवनात परिवर्तन प्रवचनादरम्यान अशोक तिडके यांनी मगध राज्यातील विविध राजघराण्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली. राजा बिंबिसार, राजा अजातशत्रू, राजा उदयन, नंदवंशीय राजा धनानंद, मौर्य घराण्यातील चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोक यांच्या संदर्भातील माहिती त्यांनी दिली. कलिंग युद्धानंतर श्रामणेर निग्रोध यांच्याशी झालेल्या भेटीमुळे सम्राट अशोक यांच्या जीवनात घडून आलेले परिवर्तन आणि त्यानंतर त्यांनी धम्मप्रसारासाठी केलेले कार्य यावर



त्यांनी विशेष प्रकाश टाकला. युद्धाच्या मार्गापासून दूर जात धम्म, करुणा, अहिंसा आणि लोककल्याणाला प्राधान्य देणाऱ्या सम्राट अशोक यांच्या कार्याचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. धम्मप्रसार आणि लोककल्याणकारी कार्याचा गौरव सम्राट अशोक यांनी बौद्ध धम्माच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती देताना तिडके यांनी तिसऱ्या धम्मसंगितीचा उल्लेख केला. धम्मपरंपरेचे जतन, शिलालेखांच्या माध्यमातून विचारांचा प्रसार, स्तूपांची उभारणी आणि धम्माचा संदेश दूरवर पोहोचविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवर त्यांनी प्रकाश टाकला. सम्राट अशोक यांनी प्राणीमात्रांप्रती दया, आरोग्यसेवा, रस्त्यांची निर्मिती आणि रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड यांसारख्या लोककल्याणकारी कार्यांना दिलेले महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. तसेच पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांच्या माध्यमातून श्रीलंकेसह विविध भागांत बौद्ध धम्माचा प्रसार झाल्याची माहिती दिली. सम्राट अशोक यांचे धम्मकार्य हे केवळ धार्मिक क्षेत्रापुरते मर्यादित नसून त्यात सामाजिक कल्याण, नैतिक मूल्ये आणि मानवतावादी दृष्टिकोन यांचा समावेश होता, असे प्रतिपादन या प्रवचनातून करण्यात आले. मान्यवरांची उपस्थिती या कार्यक्रमाला केंद्रीय शिक्षिका आयु. ज्योतिताई भालेराव, जिल्हा कार्यालयीन सचिव आद. सुषमाताई इंगळे, तालुका कोषाध्यक्ष आद. वंदनाताई वानखेडे, तालुकाध्यक्ष आयु. राजेश इंगळे, बौद्धाचार्य आद. गौतम सपकाळे, माजी श्रामणेर आद. आधारअण्णा सपकाळे, आद. समिंदर सपकाळे, आद. हिरामण लटकन सपकाळे, आद. मधुकर भवानी सपकाळे, माजी श्रामणेर अविनाश नवल सपकाळे आणि गणेश पुरुषोत्तम सपकाळे उपस्थित होते.

तळईतील शाळांजवळ गतिरोधक बसवा

माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद शाळेजवळ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर;

जन सम्राट टाईम्स

तळई, ता. एरंडोल । प्रतिनिधी: तळई गावातील माध्यमिक विद्यालयाजवळील चौक तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) तातडीने बसविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात तळई माध्यमिक विद्यालयाचे संचालक मंडळ आणि ग्रामस्थांच्या वतीने कासोदा पोलीस स्टेशनचे अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शाळांजवळ वेगवान वाहनांमुळे अपघाताचा धोका तळई येथील माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरातून वाहनांची वेगाने ये-जा होत असल्याने विद्यार्थी तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळांजवळ गतिरोधक नसल्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित होत नसून, अपघात होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दोन ते तीन दिवसांपूर्वी तळई गावात अपघात घडल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात अशा घटना घडून कोणालाही जीव गमवावा लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याची मागणी शाळा परिसरात विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे माध्यमिक विद्यालयाजवळील चौक आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ गतिरोधक बसविणे आवश्यक असल्याचे संचालक



मंडळ व ग्रामस्थांनी म्हटले आहे. संबंधित प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदन देताना मान्यवरांची उपस्थिती यावेळी अध्यक्ष दादासाहेब यशवंत खुशाल पाटील, सचिव डॉ. अभिजित राजेंद्र चौधरी, सामाजिक सेवक व सभासद गजानन शिवदास माळी, सामाजिक कार्यकर्ते निलेश उत्तम पाटील, आबासाहेब राजपूत आणि तुषार बागुल उपस्थित होते. विद्यार्थी आणि ग्रामस्थांचे जीव सुरक्षित राहावेत, अपघातांना आळा बसावा आणि भविष्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी संबंधित प्रशासनाने शाळांजवळ गतिरोधक बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, अशी मागणी तळई माध्यमिक विद्यालयाचे संचालक मंडळ आणि ग्रामस्थांनी केली आहे.तळई गावातील माध्यमिक विद्यालयाजवळील चौक तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) तातडीने बसविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात तळई माध्यमिक विद्यालयाचे संचालक मंडळ आणि ग्रामस्थांच्या वतीने कासोदा पोलीस स्टेशनचे अधिकारी तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शाळांजवळ वेगवान वाहनांमुळे अपघाताचा धोका तळई येथील माध्यमिक विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरातून वाहनांची वेगाने ये-जा होत असल्याने विद्यार्थी तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळांजवळ गतिरोधक नसल्यामुळे वाहनांचा वेग नियंत्रित होत नसून, अपघात होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दोन ते तीन दिवसांपूर्वी तळई गावात अपघात घडल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे. भविष्यात अशा घटना घडून कोणालाही जीव गमवावा लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याची मागणी शाळा परिसरात विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.प्राथमिक शाळेजवळ गतिरोधक बसविणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळ व ग्रामस्थांनी म्हटले आहे. संबंधित प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कार्यवाही करावी.

भुसावळात रंगणार 'मनोमनी'ची मैफल!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: भुसावळ येथील ज्येष्ठ व्यावसायिक स्व. सुधाकरसेठ सराफ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवारी (दि. २७ ऑक्टोबर) विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई येथील प्रसिद्ध निवेदिका मंगला खाडीलकर यांचा बहुचर्चित 'मनोमनी' हा एकपात्री प्रयोग यानिमित्ताने भुसावळकर रसिकांना अनुभवता येणार आहे. संवाद,आठवणींची गुंफण असलेल्या या कार्यक्रमाची रसिकांना उत्सुकता लागली आहे. 'आरसा'च्या यशानंतर 'मनोमनी'ची खास मेजवानी मंगला खाडीलकर यांचा 'आरसा' हा कार्यक्रम देश-विदेशांत लोकप्रिय झाला असून, त्याने दोन हजार प्रयोगांचा टप्पा पार केला आहे. याच लोकप्रिय कार्यक्रमाचे पुढचे पाऊल म्हणजे 'मनोमनी' हा एकपात्री प्रयोग होय. या कार्यक्रमात 'मनातलं आणि जनातलं' या विषयाभोवती संवाद, कथा, कविता, खुसखुशीत किस्से आणि आठवणींचे प्रभावी सादरीकरण अनुभवायला मिळणार आहे. रसिकांना हसवतानाच विचार करायला लावणारी ही मैफल भुसावळच्या सांस्कृतिक वातावरणात रंगत आणणार आहे. कार्यक्रमाचे ठिकाण आणि वेळ दिनांक: मंगळवार, २७ ऑक्टोबर २०२६ वेळ: सायंकाळी ५:४५ वाजतास्थळ: गायत्री शक्तिपीठाजवळील सुशीलाबाई फालक शाळेचे मैदान, भुसावळ अध्यक्षस्थान: डॉ. सुष्मा खानापूरकर या सांस्कृतिक कार्यक्रमाचा भुसावळसह परिसरातील रसिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन 'सुधाकर यशवंत सराफ फर्म'चे प्रमुख उज्ज्वल सराफ यांनी केले आहे.